# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
# परभणी

**जाहिरात क्रमांक./वनामकृवि-२/२०१४** दिनांक : ४/१२/२०१४

## जाहिरात

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत गट-क संवर्गातील सरळसेवा भरतीसाठी विहित अर्हता प्राप्त करणाऱ्या उमेदवारांकडून स्पर्धा परीक्षेसाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी संपूर्ण जाहिरात, अर्जाचा नमुना व दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

### १. वरिष्ठ लिपीक/तत्सम : (रु. ५२००-२०२००/- ग्रेड वेतन २४००/-):-

**प्रवर्गनिहाय पदे**

| समांतर आरक्षण | | अ.जाती | अ.जमाती | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सर्वसाधारण | ०१ | ०१ | ०१ | - | - | ०१ | ०१ | ०२ | ०४ | **११** |
| २. | महिला ३० % | ०१ | ०१ | - | - | - | - | - | ०१ | ०३ | **०६** |
| ३. | खेळाडु ०५ % | - | - | - | - | - | - | - | - | - | **-** |
| ४. | प्रकल्पग्रस्त ०५% | - | - | - | - | - | - | - | - | - | **-** |
| ५. | भुंकपग्रस्त ०२ % | - | - | - | - | - | - | - | - | - | **-** |
| ६. | माजी सैनिक १५% | - | - | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ |
| ७ | अंशकालीन पदवीधर/ पदवीकाधारक १०% | - | - | - | - | - | - | - | - | ०१ | **०१** |
| ८ | अंपग ३% | उपरोक्त पदामध्ये श्रवणदोष विकलांगता-०१ आरक्षण समाविष्ट आहे. | | | | | | | | | **-** |
| | **एकूण** | **०२** | **०२** | **०१** | **-** | **-** | **०१** | **०१** | **०३** | **०९*** | **१९** |

### २. कनिष्ठ लिपीक : (रु. ५२००-२०२००/- ग्रेड वेतन १९००/-):-

**प्रवर्गनिहाय पदे**

| समांतर आरक्षण | | अ.जाती | अ.जमाती | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सर्वसाधारण | ०२ | ०१ | ०२ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०४ | १५ | **२९** |
| २. | महिला ३०% | ०२ | ०२ | ०१ | ०१ | | ०१ | ०१ | ०५ | १३ | **२६** |
| ३. | खेळाडु ०५% | - | - | - | - | - | - | - | ०१ | २ | **३** |
| ४. | प्रकल्पग्रस्त ०५% | - | - | - | - | - | - | - | ०१ | २ | **३** |
| ५. | भुंकपग्रस्त ०२% | - | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| ६. | माजी सैनिक १५% | ०१ | ०१ | ०१ | - | - | - | - | ०२ | ६ | **११** |
| ७ | अंशकालीन पदवीधर/ पदवीकाधारक १०% | ०१ | ०१ | - | - | - | - | - | ०२ | ४ | **८** |
| ८ | अंपग ३% | उपरोक्त पदामध्ये चलनवलन विषयक विकलांगता-०१ आरक्षण समाविष्ट आहे. | | | | | | | | | |
| | **एकूण** | **६** | **५** | **४** | **३** | **१** | **२** | **२** | **१५** | **४३*** | **८१** |

### ३. लघुटंकलेखक : (रु. ५२००-२०२००/- ग्रेड वेतन २४००/-):-

| समांतर आरक्षण | | अ.जाती | अ.जमाती | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | - | ०१ | **०१** |
| | **एकूण** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **०१** | **०१** |

* शासन निर्णय क्र.बीसीसी/२०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३/१६-ब दि.२४.७.२०१४ व शासन निर्णय क्र.बीसीसी/२०१४/प्र.क्र.२१६-ए/२०१४/१६-ब दि.२४.७.२०१४ अन्वये **शैक्षणिक व सामाजिक मागास प्रवर्गाकरिता १६ टक्के व विशेष मागास प्रवर्ग-अ करिता ५ टक्के आरक्षण लागू केले आहे**. परंतु मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने मा.उच्च न्यायालयाने भरती प्रक्रियेस अंतरिम आदेशाव्दारे स्थगिती दिल्याने खुल्या प्रवर्गातील वरिष्ठ लिपीक मधून शैक्षणिक व सामाजिक मागासवर्गीय प्रवर्गाकरिता राखून ठेवलेले ०१ पद आणि कनिष्ठ लिपीक या संवर्गातील शैक्षणिक व सामाजिक मागासवर्गीय प्रवर्गाकरिता राखून ठेवलेले ०७ (महिला-०२, माजी सैनिक-०१, अंशकालीन -०१) व विशेष मागास प्रवर्ग - अ साठी ०२ (महिला - ०१) पद ही पदे खुल्या प्रवर्गातच समाविष्ट आहेत. शैक्षणिक व सामाजिक मागासवर्गीय प्रवर्गातील व विमाप्र-अ प्रवर्गातील उमेदवारांनी सर्व संबंधित कागदपत्रासह अर्ज सादर करावा.

मा.न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार शैक्षणिक व सामाजिक मागास प्रवर्गातील व विमाप्र-अ प्रवर्गाकरिता आरक्षण मान्य न झाल्यास सदर प्रवर्गातील उमेदवारांचा खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसह गुणांचे गुणवत्तेनुसार नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल.

१. समांतर आरक्षणामधील महिला, माजीसैनिक, प्रकल्पग्रस्त, भुंकपग्रस्त, खेळाडु, अंशकालीन पदविधर/पदविकाधारक, अंपग पैकी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास संबंधीत शासन निर्णयातील तरतुदीनुसार सर्वसाधारण प्रवर्गातून/कोटयातुन पदे भरण्यात येतील.
२. अपंगाकरिता एकुण ०२ (वरिष्ठ लिपीक – ०१, कनिष्ठ लिपीक - ०१) आरक्षित पदांमधून गुणानुक्रमे व गुणवत्तेनुसार ज्या जात प्रवर्गातून उमेदवार निवड करण्यास पात्र होतील त्या जात प्रवर्गातील सदर उमेदवारास अपंग प्रवर्गातून नियुक्ती देण्यात येईल. सदर अपंगाची आरक्षित पदे, रिक्त पदामध्ये समाविष्ट असल्यामुळे ज्या जात प्रवर्गातील उमेदवाराची अपंगाच्या आरक्षित पदावर निवड करण्यात येईल, त्या जात प्रवर्गातील सर्वसाधारण कोटयातील पद भरण्यात येणार नाही.
३. जाहिरातीत प्रकल्पग्रस्तांसाठी ५ टक्के आरक्षीत ठेवलेल्या पदांच्या ५० टक्के पदे विद्यापीठ प्रकल्पग्रस्त उमेदवारामधुन भरण्यात येतील.
४. सामाजिक व समातंर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी तसे अर्जामध्ये स्पष्ट नमुद करणे आवश्यक आहे.

- <u>**शैक्षणीक अर्हता :-**</u> खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनीच अर्ज सादर करावेत.

| अ. क्र. | पदाचे नांव व वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | वरिष्ठ लिपीक<br>५२००-२०२००/-<br>ग्रेड पे २४००/- | अ) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची किमान पदवी उत्तीर्ण किंवा<br>दिनांक २८/२/१९९१ पुर्वी कृषि विद्यापीठ सेवेत कार्यरत असणाऱ्यां कर्मचाऱ्यांसाठी एस.एस.सी.किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण आणि विद्यापीठ कार्यालयीन कामकाजाचा लिपीक पदाचा किमान ८ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| २ | कनिष्ठ लिपीक<br>५२००-२०२००/-<br>ग्रेड पे १९००/- | **अ)** एस.एस.सी.किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण<br>ब) शासकिय मान्यताप्राप्त इंग्रजी ४० श.प्र.मी. आणि मराठी ३० श.प्र.मी. परीक्षा उत्तीर्ण |
| ३ | लघुटंकलेखक<br>५२००-२०२००/-<br>ग्रेड पे २४००/- | 1) S.S.C. or its equivalent.<br>2) Posses Govt. commercial certificate for a speed of 80 w.p.m. in shorthand and 40 w.p.m. in English typing or 30 w.p.m. in Marathi typing. |

सांकेतीक क्रमांक १ ते ३ पदाकरिता उमेदवार डि.ओ.ई.ए.सी.सी.सोसायटीचे सी.सी.सी. किंवा **"ओ"** स्तर किंवा **"ए"** स्तर किंवा **"बी"** स्तर किंवा **"सी"** स्तर प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. प्रमाणपत्र धारक असावा किंवा नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीत संगणक विषयक उपरोक्त अर्हता प्राप्त करणे आवश्यक राहील, अन्यथा महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभगा निर्णय क्रमांक प्रशिक्षण २०००/प्र..क्र. ६१/२००१/३९ दिनांक १९ मार्च २००३ अन्वये संबंधीत उमेदवाराची नियुक्ती रद्द/समाप्त करण्यात येईल.

**१. वयोमर्यादाः-**

अ. अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास **०४/०१/२०१५** रोजी किमान १८ वर्ष व कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी ३३ वर्ष व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ३८ वर्ष राहील.

ब. **माजी सैनिक :** शासन शुध्दीपत्रक क्र. मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अे दिनांक २०.८.२०१० अन्वये माजीसैनिकासाठी शासन सेवेतील वर्ग-३ मधील पदावर नेमणुकीसाठी विहित वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलातील झालेल्या सेवेचा कालावधी अधिक ३ वर्ष इतका राहील.

क. **प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्तः** उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष राहील. (शासन निर्णय क्र.प्रकल्प-१००६/मु.स.३९६/प्र.क्र.५६/०६/१६-अ,दिनांक ३.२.२००७).

ड. **अंशकालीन कर्मचारीः** उच्चतम वयोमर्यादा ४६ वर्ष राहील. (शासन निर्णय क्र.पअंक-१००५/प्र.क्र.३६/०५/१६-अ,दिनांक २६.८.२००५ व शासन निर्णय दिनांक २६.१०.०९).

इ. **अपंग :** अंपग उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष राहील. (शासन सा.प्र.वि. परिपत्रक क्र. न्या.प्र.-१००३/९९/प्र.क्र.-२/०३ (भाग-२)/ १६-अे, दिनांक २५.१०.२००५ चे सहपत्र-९ व शासन परिपत्रक दिनांक ४.८.२०११).

फ. **खेळाडू :** उच्च वयोमर्यादेत ५ वर्षापर्यत वयाची अट शिथिलक्षम (शासन निर्णय क्र.राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दिनांक ३०.४.२००५).

ग. **स्वातंत्र्य सैनिकाच्या नामनिर्देशित पाल्य/सन १९९१ चे जनगणना कर्मचारी/ सन १९९४ चे निवडणुक कर्मचारी** यांना कमाल वर्यामर्यादा ४५ वर्ष इतकी राहील. सदर वयोमर्यादा सरसकट शिथील केलेली असल्याने या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष इतकीच राहील. (शासन निर्णय क्र. निवक/१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ दिनांक ६.१०.२०१०)

च. विद्यापीठातील तसेच शासकीय/निमशासकीय /सहकारी संस्था/स्थानिक स्वराज्य संस्था/ महामंडळे तसेच इतर मान्यताप्राप्त संस्था व संविधानिक विद्यापीठे यांचे सेवेत असलेल्या कर्मचारी/**रोजंदारी मजूर** व कुशल मजूर (कर्मचारी) यांना कमाल वयोमर्यादा शासनाचे नियमानुसार शिथीलक्षम राहील.

**२. अर्ज कसा करावाः-**

जाहिरातीतील सविस्तर माहिती, सर्वसाधारण अटी/सुचना, निवडीची पध्दत संबंधित शासन निर्णय इ. बाबतचा तपशिल वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या संकेतस्थळ (**http://mkv2.mah.nic.in**) वर देण्यात आलेला आहे. उमेदवारांनी विहित नमुन्यात अर्ज करुन परिपुर्ण अर्जासोबत **नियंत्रक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी** यांच्या नांवे काढलेला स्टेट बँक ऑफ इंडिया/ स्टेट बँक ऑफ हैद्राबाद या राष्ट्रीयकृत बँकेचा योग्य रकमेचा

धनाकर्ष जोडावा व अर्ज कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी- ४३१४०२ यांचे कार्यालयात **दिनांक ०४/०१/२०१५** पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवावा किंवा प्रत्यक्ष कार्यालयीन वेळेत सादर करावा, त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. पोस्टाव्दारे पाठविलेले अर्ज विलंबाने प्राप्त झाल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

| **पदाचे नांव** | **आवेदन शुल्क** |
|---|---|
| सांकेतीक क्रमांक १ ते ३ | खुला प्रवर्ग-३००/-<br>मागास प्रवर्गाकरीता-१५०/- |
| **टिपः**शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.-४६/०७/१३-अे, दिनांक १९.१०.२००७ मधील निर्देशानुसार माजी सैनिक उमेदवारांनी डिस्चार्ज प्रमाणपत्र (Discharge Certificate) सादर केल्यास त्यांना आवेदन शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. | |

**<u>३. लेखी परिक्षा व गुणविभागणी :-</u>**

शासन निर्णय क्र. प्रानिमं-१२१४/प्र.क्र.-(४३/१४)/१३-अ, दिनांक ५.६.२०१४ चे अनुषंगाने व विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्र. का-४५/१८० दिनांक १९.८.२०१४ मधील निर्देशानुसार वरिष्ठ व कनिष्ठ पदांकरीता लेखी परिक्षा २०० गुणांची राहील. त्यात मराठी - ५०, इंग्रजी - ५०, सामान्यज्ञान - ५०, बौध्दिक क्षमता चाचणी-५० गुण राहतील. लघुटंकलेखक पदाकरीता लेखी परीक्षा - १२० गुण व व्यावसायीक चाचणी परीक्षा ८० असे २०० गुणांची परीक्षा राहिल.

शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ दि.२७.६.२००८ मध्ये नमूद केल्यानुसार गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान ४५टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

सदर परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील तसेच प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास अधिकाधिक २ गुण ठेवण्यात येतील.

लेखी परिक्षेत काळया शाईच्या बॉलपेनचा वापर करणे बंधनकारक राहील
(शासन निर्णय दिनांक १९.६.२०१०).

**<u>४. जाहिरातीतील अटी व शर्ती :-</u>**

१. अर्जदार हा महाराष्ट्रातील रहिवाशी असावा.

२. अर्जदाराने अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या सांक्षाकीत प्रती जोडावेत.

१) शाळा सोडल्याचा दाखला/शालांत परिक्षा प्रमाणपत्र.
२) शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्याबद्दल प्रमाणपत्र/प्रमाणपत्रे.
३) सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र.
४) असल्यास जात वैधता प्रमाणपत्र.
५) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र
(दिनांक १.४.२०१४ किंवा त्यानंतर निर्गमीत केलेले प्रमाणपत्र)
६) प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त प्रमाणपत्र.
७) अंशकालीन कर्मचारी असल्याबद्दलचे प्रमाणपत्र.
८) अपंग प्रमाणपत्र.
९) लहान कुटूंब प्रतिज्ञापन मर्यादा प्रमाणपत्र.
१०) इतर संबंधीत प्रमाणपत्र.

३. अलिकडच्या काळातील काढलेले पारपत्र (पासपोर्ट) आकारातील छायाचित्र उमेदवाराने त्याच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे व एक अतिरिक्त छायाचित्र पुढील कार्यवाहीसाठी अर्जासोबत जोडावे.

४. एका पेक्षा जास्त पदाकरिता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी/विषयासाठी स्वतंत्र अर्ज करणे व आवेदन शुल्क भरणे आवश्यक आहे.

५. उमेदवार ज्या राखीव जात प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जात प्रवर्गाचे जातीचे प्रमाणपत्र व असल्यास जात वैधता प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तथापी उमेदवाराची अंतिमतः निवड झाल्यास शासन निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/११/१६-ब,दिनांक १२.१२.२०११ अन्वये ६ महिन्यात जात प्रमाणपत्र वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून घेणे आवश्यक राहील.

६. शासन निर्णय दिनांक ३१ जुलै २०१४ अन्वये शैक्षणिक व सामाजिक मागास प्रवर्ग (मराठा आरक्षण) व विशेष मागास प्रवर्ग-अ(मुस्लीम आरक्षण) लाभ घेवु इच्छिना-या उमेदवारांनी देखील जात प्रमाणपत्र व असल्यास जात वैधत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच सदर प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत (नॉन क्रिमिलेअर) सक्षम अधिकाऱ्याचे **दिनांक १/४/२०१४** रोजी किंवा त्यानंतर निर्गमीत केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

७. महिला आरक्षण, शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्रंमाक ८२/२००१/मसेआ-२०००/ प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५.५.२००१ मधील तरतुदीनुसार राहील. मागासवर्गीय प्रवर्गातील महिलांनी त्यांच्या प्रवर्गातील महिला आरक्षणाच्या लाभाकरिता सक्षम अधिका-याने निर्गमित केलेले जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच महिला आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणा-या महिला उमेदवारांपैकी अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती मधील उमेदवार वगळून अन्य मागासवर्गीय महिला उमेदवारांनी व खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत (नॉन क्रिमिलियर) प्रमाणपत्र **दि.१/४/२०१४** रोजी किंवा त्यानंतरचे सक्षम अधिका-याने निर्गमित केलेले जोडणे आवश्यक आहे.

८. अंशकालीन कर्मचा-याने त्यांच्या शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयातील अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. त्याबाबतचा पुरावा अर्जा सोबत जोडावा.

९. भुकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी उच्च वयोमर्यादेत शिथिलतेकरिता भुकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचे सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०. शासन निर्णय दिनांक ६.५.२००४ मधील निर्देशानुसार संबंधीत अंपग प्रवर्गातील किमान ४० टक्के अंपगत्व असल्याबाबत सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्याने दिलेले विहित नमुन्यातील वैद्यकीय प्रमाणपत्र उमेदवारांनी अर्जा सोबत जोडावे. तसेच शासन परिपत्रक दिनांक १.१२.२००६ अन्वये अपंग उमेदवाराने लेखनिकाची मदत आवश्यक असेल तर अर्जातच तसा उल्लेख करुन लेखनिकाची परिक्षेची ना-परतावा फिस प्रथम रुपये १००/- लेखी परिक्षेपुर्वी रोख स्वरुपात पर्यवेक्षकांकडे जमा करणे आवश्यक राहील.

११. अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण हे शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक रक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२ दिनांक ३० एप्रील २००५ दि. १७.०८.२०१० शासन निर्णय क्रमांक : क्री स्पर्धा-२१०८ (प्र.क्र ४४०/०८)/ क्रीयुसे-२, दि. २० डिसेंबर २०१३ व शासन निर्णय क्र.राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि. ३०.१२.२०१३ मधील तरतुदीनुसार राहील. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्य स्तरावरील / अखील भारतीय आंतर विद्यापीठ स्तरावरील प्रमाणपत्र (शासन निर्णय परिशिष्ट-अ मधील नमुद) खेळाचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिका-याचे असावे. प्रमाणपत्राचे पात्रतेबाबत क्रिडा संचालनालयाच्या निर्णय अंतिम राहील. असे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याखेरीज नियुक्ती दिली जाणार नाही.

१२. परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे, तसेच कोणतीही पदे भरणे अथवा न भरणे तसेच शासनस्तरावरुन मंजूर पदामध्ये कमी अधिक बदल झाल्यास त्याबाबतचे सर्व अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१३. शासकीय/निमशासकीय/शैक्षणिक संस्था/सहकारी संस्था/स्थानिक स्वराज्य संस्था/ महामंडळे इत्यादीच्या सेवारत कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या मार्फत, अर्ज करावयाच्या शेवटच्या दिनांका पर्यंत **पोहचतील अशाबेताने पाठवावे.** अर्जाची आगावू प्रत (Advance Copy) स्वीकारली जाणार नाही.

१४. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अनियो/१००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१.१०.२००५ नुसार दिनांक १.११.२००५ रोजी किंवा त्यांनतर ज्यांची शासकीय / निम शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. मात्र सध्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना नियम १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेल्या सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी योजना त्यांना लागू असणार नाहीत.

१५. सेवायोजन कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी सुध्दा या जाहिरातीनुसार विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

१६. उमेदवाराने त्यांच्या निवडीबाबत निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा निवड प्रक्रीयेत तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्यांना निवडप्रक्रियेतून कोणत्याही टप्प्यावर बाद करण्यात येईल.

१७. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांनी चुकीची माहिती/प्रमाणपत्रे /कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही सत्य माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्यात येईल.

१८. उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी नियोजीत स्थळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१९. सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना २००५ दिनांक २८.३.२००५ व शासन परिपत्रक दिनांक १.७.२००५ नुसार अर्जासोबत कुटूंब मर्यादा प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. (अविवाहीत उमेदवारांनी प्रतिज्ञापनातील क्र. २ व ३ भरण्याची आवश्यकता नाही.)

२०. अर्ज कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे कार्यालयात एकदा प्राप्त झाल्यानंतर त्यास जोडण्यासाठी कोणत्याही प्रकारची प्रमाणपत्रे /कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.

२१. टपालाद्वारे पाठविलेले अर्ज विहित मुदतीत अर्ज स्विकारण्याच्या ठिकाणी प्राप्त झाले नाहीत किंवा उशीरा प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच विहित प्रपत्रात नसलेले अर्ज, अपूर्ण भरलेले अर्ज, अर्जावर स्वाक्षरी नसलेले अर्ज, फोटो नसलेले अर्ज, प्रमाणपत्राच्या सांक्षाकीत प्रति नसलेले अर्ज व विहीत शुल्काचा धनाकर्ष नसलेले अर्ज रद्द ठरविण्यात येतील व या संबंधी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२२. लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांची नांवे/अपात्र ठरलेल्या उमेदवारांची नांवे, अपात्रतेच्या कारणांसह विद्यापीठ संकेतस्थळ (http://mkv2.mah.nic.in) वर उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तूत करण्यात येतील. अपात्र ठरलेल्या उमेदवारांचा, अपात्रते बाबत कांही आक्षेप असल्यास विहित मुदतीत कागदपत्रे/प्रमाणपत्राच्या पुराव्यासह सादर करणे आवश्यक आहे. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेपांची दखल घेतली जाणार नाही याची संबंधीत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२३. उमेदवाराने अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती / छायांकित प्रती साक्षांकीत केलेल्या असाव्यात, अन्यथा त्यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२४.अर्जदाराने अर्ज केलेल्या पदाकरिता आवश्यक असणारी शैक्षणीक अर्हता, अनुभव, वय इत्यादी बाबींची पूर्तता अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजेच **दिनांक ०४/०१/२०१५** पर्यंत विचारात घेतली जाईल.

२५.निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालयात करण्यात येईल.

२६.राज्य शासन/निमशासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी सेवारत असलेल्या कर्मचा-यांची निवड झाल्यास विद्यापीठ सेवेत रुजू होण्याकरीता त्यांना त्यांच्या पूर्वीच्या पदाचा राजीनामा देणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांना विद्यापीठ सेवेत रुजू करुन घेतले जाणार नाही.

दिनांक : ०४/१२/२०१४ **कुलसचिव**